# सावली २००८

स्मिता भागवत. टोरांटो.

नमस्कार दादा!

वय आणि प्रकृतीचे प्रश्न डावलून सावलीचा उपक्रम चालू ठेवण्याच्या कार्यास शतशः वंदन!

सावली २००८ च्या सर्वांग सुंदर अंकाचे वाचन, गणपती उत्सवात अवीट आनंद ठरला. दिवाळी अंकांच्या भाऊगर्दीत उत्तम अंक नजरेआड राहतात. त्या दृष्टिने अंक गणपतीवेळी काढण्याची योजकता अर्थपूर्णच! महाराष्ट्राचे दैवत गणपती! विद्येची देवता! मराठी माणूस बुद्धिप्रामण्यवादी! ज्ञानाची कास धरणारा! त्या दृष्टिनेही या आराध्यदैवताच्या उत्सवात अंक प्रकाशित होण्यास औचित्य आहे.

'रंग माझा वेगळा' ही घोषणा अंकाच्या संदर्भात सावली इंटरनेटवर झालीच होती. कथा, लेख, हास्य, काव्य व मुलाखतींचा हा पंचरंगी नजराणा! त्यात पश्चिमरंग आहे नि पूर्वरंगही! स्थलांरितांनाच प्रकाशात आणण्याचा अट्टाहास नाही की पश्चिमरंगास फिके लेखून कौतुकाच्या अतिरेकात पूर्वरंग बटबटीत करणे नाही. प्रेमरंगाचे ऐतिहासिक रुप आहे तशी फांदीवरील प्रेमायणाची गंमत आहे. आनंदी छत्रीच्या निमित्ताने नवीनतम समस्येचा रंगही रंगोत्सवाचा भाग आहे. अंधार-उजेड, कंस-कृष्ण, राम-रावण या जोड्या जगास आगळे रुप प्रदान करतात, याची चुणूक आहे नि स्त्रीचे भावविश्व उलगडताना कारुण्यासोबत सुरक्षेच्या काळजीत निर्माण होणाऱ्या संशयाचे हलके फुलके रंगही आहेत. सर्व रंगावर प्रेम करणाऱ्या ललिता गंडभीर, सर्वात प्यारा रंग कुठचा, या प्रश्नाच्या उत्तरात कळीची भावना व्यक्त करतात - 'एकच उत्तर डोळ्यासमोर नाचतंय जो समोर असेल ना, तो!' सर्वरंगस्पर्शी अंकास प्रेम, समस्या, इतिहास आधुनिकता, सिनेमा, संगीत .... कोणत्याही रंगाचे वावडे नाही. श्री. दादा कारखानीस व श्री. श्रीनिवास माटे यांनी कोणताही विशिष्ट अभिनिवेश न बाळगणाऱ्या सर्वस्पर्शी अंकाचे संपादन नेटकेपणाने केले आहे.

कृतीच्या उल्लेखासोबत पृष्ठक्रमांक असणे सोयीचे असते. विशेषतः पूर्ण अंक वाचल्यावर जेव्हा पुन्हा काही वाचावेसे वाटते, तेव्हा! सुंदर अंकाची चूक दाखवण्याचा हा छिद्रान्वेशी प्रपंच नाही. सावलीचा अंक वाचनासाठी अधिक सोयीचा व्हावा यासाठी ही सद्भावना असल्याची नोंद मला आवश्यक वाटते.

प्रत्येक काम अनेकांनी संपन्न केलेले टीमवर्क असते. सारे प्रकाशाच्या रंगात स्पष्ट दिसू शकत नसले तरी प्रत्येकाचे कार्य महत्वाचे असते. भारतीय भाषांच्या आशयघनतेविषयी मला नितांत आदर आहे. प्रकाशक व प्रकाशन या शब्दात जी अनुभूती जाणवते ती मला पब्लिशर व पब्लिकेशनमध्ये जाणवत नाही. सृजनास प्रकाश दाखवतो तो प्रकाशक! प्रकाशन म्हणजे प्रकाशकाच्या उत्तम टीमच्या कार्याचा परिपाक! सावली २००८ चा परिपाक मुखपृष्ठापासून शेवटच्या पानापर्यंत देखणा करण्यात लेखक, संपादक, कवी, सल्लागार, चित्रकार, वगैरे साऱ्यांचा महत्वाचा वाटा आहे. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या उद्घोषात 'असा अंक पुन्हा लवकर हाती पडो,' ही परोक्ष इच्छेचा निनाद मला जाणवतोय. यासाठी या निर्मितीत सहभाग असलेल्या प्रत्येक 'हाताचे' मनःपूर्वक आभार.

स्मिता भागवत.
1139-25 Bamburgh Circle.
Scarborough ON. M1W3W2.
Canada. 1-416-497-7575
smita_bhagwat@hotmail.com